# मविप्र पत्रिका

विद्यापीठ विशेषांक

शिक्षणातून सामाजिक समृध्दीकडे

वर्ष : दुसरे | अंक: तिसरा | ऑक्टोबर २०२५



# मविप्र पत्रिका

वर्ष : दुसरे | अंक: तिसरा | ऑक्टोबर २०२५



मुख्य संपादक

**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**

(सरचिटणीस, म.वि.प्र.समाज, नाशिक)

कार्यकारी संपादक

**प्राचार्य डॉ. दिलीप पुंडलिक पवार**

सल्लागार मंडळ : म. वि. प्र. समाज, नाशिक कार्यकारी मंडळ पदाधिकारी

**डॉ. सुनील उत्तमराव ढिकले** (अध्यक्ष)

**श्री. विश्वास बापुराव मोरे** (उपाध्यक्ष)

**श्री. बाळासाहेब रामनाथ क्षीरसागर** (सभापती)

**श्री. देवराम बाबुराव मोगल** (उपसभापती)

**श्री. दिलीप सखाराम दळवी** (चिटणीस)

कार्यकारी मंडळ तालुका सदस्य

**ॲड. संदीप गोपाळराव गुळवे**

**डॉ. सयाजीराव नारायणराव गायकवाड**

**ॲड. लक्ष्मण फकिरा लांडगे**

**श्री. अमित उमेदसिंग बोरसे**

**ॲड. रमेशचंद्र काशिनाथ बच्छाव**

**श्री. कृष्णाजी गणपत भगत**

**श्री. रमेश पांडुरंग पिंगळे**

**श्री. रवींद्र शंकर देवरे**

**श्री. प्रवीण एकनाथ जाधव**

**श्री. शिवाजी जयराम गडाख**

**डॉ. प्रसाद प्रभाकर सोनवणे**

**श्री. नंदकुमार बालाजी बनकर**

**श्री. विजय पोपट पगार**

**श्रीमती शोभा भागवत बोरस्ते** (महिला सदस्य)

**श्रीमती शालन अरुण सोनवणे** (महिला सदस्य)

सेवक सदस्य

**प्रा.डॉ. संजय खंडेराव शिंदे** (उच्च माध्य. व महाविद्यालयीन विभाग)

**श्री. चंद्रजित दयाराम शिंदे** (प्राथमिक व माध्यमिक विभाग)

**श्री. जगन्नाथ मधुकर निंबाळकर** (प्राथमिक व माध्यमिक विभाग)

शिक्षणाधिकारी

**प्रा. डॉ. भास्कर ढोके**

**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे**

**प्रा. श्री. दौलत जाधव**

**प्रा. डॉ. कैलास शिंदे**

**प्रा. डॉ. नितीन जाधव**

**प्रा. डॉ. विलास देशमुख**

**प्रा. डॉ. अजित मोरे**

**प्रा. श्री. शशिकांत मोगल**

संपादन सहाय्य

**प्राचार्य श्री. प्रशांत पाटील**

**श्री. नितीन कवसकर**

**श्री. रवींद्र आखाडे**

**श्री. सोमनाथ गांगुर्डे**


मुखपृष्ठ संकल्पना व अंकांची मांडणी

**मविप्र कलाविभाग**



**प्रकाशक :** सरचिटणीस, म. वि. प्र. समाज, नाशिक


**मुद्रक :** मराठा विद्या प्रसारक समाज, प्रिंटिंग प्रेस, नाशिक.

मराठा विद्या प्रसारक समाज,नाशिक चे

# मविप्र विद्यापीठ

## गरज, संधी व आव्हाने




मा. सभासद व हितचिंतक बंधू आणि भगिनींनो,

मविप्र समाज संस्थेचा १११ वर्षांचा इतिहास अत्यंत समृद्ध, प्रेरणादायी आणि दिशादर्शक राहिलेला आहे. कर्मवीरांच्या आणि समाजधुरीणांच्या अथक परिश्रम, त्याग आणि सेवाभावातून ५१० शाखांच्या रूपाने संस्थेचा वटवृक्ष गुणवत्ता आणि ज्ञानाने बहरला आहे. त्या पवित्र आणि जीवनोपयोगी ज्ञानाची मधुर फळे लाखो विद्यार्थी चाखत आहेत. बहुजन, गोरगरीब आणि गरजवंतांप्रति असलेली कणव आणि बांधिलकी संस्थेचा आत्मा आहे. कर्मवीरांचा उच्च ध्येयवाद, विधायक विचारधारा आणि ज्ञानकेंद्री दृष्टिकोन हे म.वि.प्र. समाजाचे बलस्थान आहे. हे ज्ञानधन अर्थात समाजसंचित जिवापाड सांभाळणे आणि कालसुसंगत शिक्षण देणाऱ्या नवीन ज्ञानशाखा सुरू करणे हे कर्मवीरांचे समर्थ व सक्षम पाईक म्हणून आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. म.वि.प्र. समाजाच्या सेवेची ही पवित्र जबाबदारी सांभाळताना आपण सर्वजण आम्हा कार्यकारी मंडळास खंबीर साथ देत आहात त्याबद्दल आम्ही आपले शतशः ऋणी आहोत.


रविवार दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी संस्थेच्या पार पडलेल्या १११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण आपला बहुमोल वेळ काढून उत्सुकतेने आणि मोठ्या संख्येने सहभागी झालात. आपण सर्वांनी जिवापाड जपलेल्या मविप्रच्या प्रगतीचा व गुणवत्तेचा उंचावलेला २०२४-२५ चा आलेख, दर्जेदार शिक्षणासाठीचे विद्यार्थिकेंद्री उपक्रम, कर्मचाऱ्यांचे कौशल्य विकास व पगारवाढ, संस्थेची आर्थिक स्वयंपूर्णता आदींसंबंधीचे जवळपास सव्वा तासाचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन आपण तन्मयतेने ऐकून घेतले. आपल्या चेहऱ्यांवरील समाधानाचे भाव आणि आपण दिलेल्या उत्तम कामांविषयीच्या उत्कृष्ट प्रतिक्रिया आम्हाला बळ देऊन गेल्या. सर्वसाधारण सभेच्या सूचना पत्रिकेत एकूण नऊ विषय होते व त्यातील सात विषयांना सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. त्यातील आठ क्रमांकाचा "मविप्र विद्यापीठ स्थापन करणेबाबत कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयास मंजुरी देणे" हा अत्यंत महत्त्वाचा विषय होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेणे नियोजित होते. मात्र विरोधकांनी त्यावर चर्चा होऊ न देणे हे संकेतबाह्य कृत्य होते.

बंधू आणि भगिनींनो, बदलत्या काळात दर्जेदार नोकऱ्या देणारे हजारो हात तयार करणारे, स्वयंरोजगार निर्माण करणारे आणि पदव्या मिळताच नोकऱ्या देणारी विद्यापीठे निर्माण करणे ही अनिवार्य बाब बनलेली आहे. २०२७ पर्यंत सर्व शिक्षणसंस्था स्वायत्त आणि बहुविद्याशाखीय बनविणे व २०३० पर्यंत स्वायत्त विद्यापीठांची स्थापना करणे हे नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे भविष्यात सर्वच संस्थांची महाविद्यालये ही स्वायत्त होणार आहेत. त्यावेळी संस्थेची सर्वच वरिष्ठ महाविद्यालये अत्यंत सक्षमरित्या टिकून ठेवणे हे मोठे आव्हान आपणासमोर असणार आहे. त्या अनुषंगाने संस्थेचे स्वतःचे स्वयं अर्थ सहाय्यित (म्हणजेच स्वतःच पैसा निर्माण करून उभारलेले) 'मविप्र विद्यापीठ' ही काळाची गरज आहे. हे विद्यापीठ संस्थेच्या सध्याच्या एकाही शासनमान्य महाविद्यालयाचे विद्यार्थी, स्टाफ व भौतिक सामग्री यांना धक्का न लावता उभारले जाणार आहे. त्यात संस्थेचे एकही अन्य कॉलेज सामावून घेतले जाणार नाही किंवा त्यांची ओळख पुसली जाणार नाही. ५११ वी शाखा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विद्यापीठावर इतर शाखांप्रमाणेच फक्त आणि फक्त संस्थेचीच मालकी असणार आहे. त्या त्या पंचवार्षिक कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी आणि संचालकच त्याचे चालक असणार आहेत. या विद्यापीठाची अधिकार मंडळ रचना, प्रवेश प्रक्रिया धोरण, स्टाफ नेमणुका, अभ्यासक्रम आराखडा आदी सर्व बाबी संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या मंजुरीने व सभासदांच्या मार्गदर्शनानेच होणार आहेत. मविप्र विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे उच्चतम शिक्षण देणारी शाखा असणार आहे.

हे विद्यापीठ सभासद पाल्य, भूमिपुत्र, मोठ्या शहरांत जाणाऱ्या

मुलामुलींच्या शिक्षणाची सोय व रोजगाराच्या संधी आपल्या नाशिक शहरातच निर्माण करेल ही काळ्या दगडावरची रेघ असणार आहे. भविष्यात वाढवण बंदर हे नाशिकशी जोडले जाणार आहे. म.वि.प्र. त्या अनुषंगाने तसेच जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि अन्य संस्थांशी झालेल्या करारानुसार त्यातील उद्योग, सेवाक्षेत्रे व रोजगारांशी निगडित कोर्सेस विद्यापीठात सुरू करणार असल्याने भविष्यात या विद्यापीठातील पदवीधरांना अर्थात सभासद व हितचिंतकांच्या पाल्यांना मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळतील यात शंका नाही. तेव्हा आपल्या कार्यकारिणीने बहुमताने मंजूर केलेल्या या विषयासंबंधीचा आमचा हेतू अत्यंत प्रामाणिक व शुद्ध आहे. सभासदांना अंधारात न ठेवता त्यावर चर्चा व चिंतन होऊन निर्णय व्हावा हा आमचा प्रथमपासूनचा मनोदय होता. म्हणूनच हा विषय आम्ही सर्वसाधारण सभेसमोर ठेवला होता. पहिले सात विषय सभेने बहुमताने मंजूर केले. आठवा विषय पुकारल्यानंतर मविप्र च्या घटनेला धरूनच विद्यापीठाची निर्मिती, गरज, संधी आणि फायदे कोणते? हे प्रेझेंटेशनच्या माध्यमातून आम्ही आपल्यासमोर ठेवणार होतो. मात्र काही विघ्नसंतोषी व्यक्तींनी ही सत्यता तुमच्यापर्यंत पोहोचू नये म्हणून व्यासपीठावर प्रचंड गोंधळ सुरू केला, धक्काबुक्की केली. स्टेज समोरील मंडळी लागलीच स्टेजवर येऊन त्यांनी ठरवून घोषणाबाजी व दहशत सुरू केली आणि अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले यांनी विषय मंजूर असतानाही नामंजूर म्हणत एकप्रकारे या गोंधळाला उत्तेजन दिले आणि आठव्या विषयाची चर्चा होऊच नये म्हणून व नववा विषय शिल्लक असतानाही त्यांनी लगेच राष्ट्रगीत सुरू करून सभाच उधळून लावली. त्यावेळी ज्ञानदेवतेनं खाली मान घातली असे म्हणावे लागेल. सर्व सभासदांना ही बाब फारच खटकली. विरोधकांनी विद्यापीठाची सत्यता आणि सभासद यांच्यात भिंत निर्माण केली. सभा उधळून लावून सर्व सभासदांच्या भावनांना आणि सन्मानाला ठेच पोचवली. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात प्रतिष्ठेचे बिरूद मिरवणाऱ्या आपल्या मविप्र माऊलीची प्रतिमा मलीन झाली. त्यांनी त्या विषयावर कुठल्याही प्रकारे चर्चा न होऊ देता विद्यमान अध्यक्ष व माजी सरचिटणीस यांनी तो विषय नामंजूर करण्याचा प्रयत्न केला. कळस म्हणजे संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेचे बोधचिन्ह असलेल्या आपल्या सर्वांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा असलेल्या पोडियमवर उभे राहत अरेरावीचे व दडपशाहीचे दर्शन घडवले. संपूर्ण विश्वाला वंदनीय अशा मराठी अस्मितेचा अवमान झाला. त्यांना साथ देत यापूर्वी संस्थेचे सरचिटणीस पद भूषवलेल्या श्रीमती नीलिमा पवार व त्यांच्या वादग्रस्त कार्यकर्त्यांनी दहशत व दडपशाही प्रवृत्ती, अपरिपक्व व पोरकटपणाचे दर्शन घडवले, हे कृत्य निश्चितच निषेधार्य होते, जे सभासदांनी याची देही याची डोळा बघितले या सर्व प्रकारामुळे "एक मराठा, लाख मराठा" ही जी मराठा समाजातील एकता आणि शक्तीच्या प्रतीकाची घोषणा आहे, तिचे विरोधकांनी अवमूल्यन केले. स्टेजवर शस्त्रधारी व्यक्तीचा वावर सर्वांनी पाहिला हे वास्तव अत्यंत खेदजनक व भयावह होते. संस्थेच्या इतिहासाला काळिमा फासणारी ही घटना घडवल्याचे दुःख डोंगराएवढे आहे. चर्चा होऊन जो निर्णय झाला असता त्याचे आम्ही स्वागतच करणार होतो. पण विरोधकांना चर्चा घडूच द्यायची नव्हती. विरोधकांची ही राजकीय खेळी लक्षात आल्यानंतर त्याच ठिकाणी मंजूर निर्णयाची सर्वांगीण माहिती देण्यासाठी उपस्थित सभासदांच्या आग्रहास्तव मी व पदाधिकाऱ्यांनी विद्यमान कार्यकारी मंडळाच्यावतीने योग्य स्पष्टीकरणासह सभेला उद्बोधित केले तदनंतर उपस्थित सभासदांनी विद्यापीठ निर्मितीचा ठराव मंजूर केल्याबद्दल कार्यकारी मंडळाचे आभार मानून सभेची सांगता झाली.

खरे तर गेल्या दोन वर्षांपासून भविष्यकालीन नवीन योजनांमध्ये आयुर्वेदिक महाविद्यालय, होमिओपॅथी महाविद्यालय, स्पोर्ट अकॅडमी यांच्याबरोबरच स्वयं अर्थ सहाय्यित ' मविप्र विद्यापीठा ' चा समावेश केलेला आहे. संस्था निवडणुकीच्या आमच्या जाहीरनाम्यात तो विषय अग्रक्रमाने होता. सर्वसाधारण सभा आणि वार्षिक अहवालातून तो विषय



सर्व मायबाप सभासदांपर्यंत आधीच पोहोचलेला होता. तरीही विरोधकांनी त्यावर साधकबाधक चर्चा होऊ न देणे ही घटनाबाह्य व लोकशाही तत्त्वांना हरताळ फासणारी बाब आहे.

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो, तुम्ही आमचे मार्गदर्शक व आधारस्तंभ आहात. तसेच सत्याचे पाठीराखे आहात. खरे तर विधायक कामासाठी सत्ताधारी आणि इतर सर्वांनी एकत्रित येऊन चर्चा करायला हवी. मात्र तसे न करता कोणी यात राजकारण आणून संस्थाहिताला बाधा आणत असेल आणि विद्यमान कार्यकारिणीला अडचणीत आणत असेल तर त्यांना योग्य तो जाब तुम्हीच विचारू शकता. सत्य जाणून न घेता मविप्र विद्यापीठाविषयी विरोधकांच्या संभ्रमित करणाऱ्या विषारी बातम्या, दिशाभूल करणाऱ्या व्हिडिओ क्लिप्स या उद्विग्न करणाऱ्या आहेत. त्या संस्थाहिताला बाधा पोचविणाऱ्या आणि सर्वांना वेठीस धरणाऱ्या आहेत. त्यामुळे संस्थेने करार केलेल्या संस्था व उद्योगसमूहांचा संस्थेकडे बघण्याचा दृष्टिकोन हा नकारात्मकतेकडे जाऊ शकतो. परिणामी संस्थेला मिळणाऱ्या लाखोंच्या सीएसआर फंडावर आच येऊ शकते याचे भान विरोधकांनी ठेवणे आवश्यक होते. पण तसे घडले नाही.

काळाची पावले ओळखून विद्यापीठाचा योग्य तो निर्णय आपल्याला पूर्ण विचारांती घ्यावा लागणार आहे. अन्यथा आपण जगाच्या स्पर्धेत मागे पडू. अशावेळी पूर्ण सत्य जाणून संस्थाहिताचा निर्णय घेणे हा आपणा सर्वांचा नैतिक अधिकार आहे. आपला विधायक निर्णय हा पुढील अनेक पिढ्यांच्या उद्धाराची गुरुकिल्ली ठरणार आहे व तो सर्वांसाठी बंधनकारक असणार आहे हे निर्विवाद सत्य आहे.

मविप्र विद्यापीठ हे चंद्र सूर्य असेपर्यंत फक्त आणि फक्त संस्थेच्या मालकीचे राहील. त्याची जमीन, वास्तू आणि सर्व प्रकारची मालमत्ता ही संस्थेचीच असणार आहे. त्यासाठी मविप्र विद्यापीठाची सर्व रचना सर्वांनी जाणून घ्यायलाच हवी. यातील पूर्ण सत्य सर्व सभासदांना कळायलाच हवे. त्यातून साधले जाणारे विद्यार्थी हित, रोजगार संधी, सभासदांना प्राधान्य आणि अनेक फायदे हे सर्व सूक्ष्म तपशिलांसह तुमच्यापर्यंत पोहोचावे यासाठीच हा सर्व लेखनप्रपंच केलेला आहे. आपल्या मनातील सर्व शंकांचे समाधान या पुस्तिकेतील लेखन करेल असा आम्हाला विश्वास आहे म्हणूनच आपण ही पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी. अपप्रचार आणि गैरसमजांना कुठल्याही प्रकारे थारा न देता मविप्र विद्यापीठ रूपाने हा मंगल ज्ञानकलश संस्थेच्या दारी आणावा, ही कळकळीची विनंती. धन्यवाद.

आपला नम्र<br>
**ॲड. नितीन बाबुराव ठाकरे**<br>
सरचिटणीस, मविप्र समाज, नाशिक.

# महाराष्ट्रातील विद्यापीठांचे अवलोकन

**सद्यस्थितीत महाराष्ट्रातील विद्यापीठांची संख्या खालीलप्रमाणे आहे :**

- केंद्रीय विद्यापीठ : ०१ (म. गांधी आंतरराष्ट्रीय हिन्दी विश्वविद्यालय, वर्धा)
- राज्य सरकारी /सार्वजनिक विद्यापीठे : २३
(०३ समूह {Cluster} विद्यापीठे, रयत शिक्षण संस्थेच्या विद्यापीठासहित)
- अभिमत विद्यापीठे : २१ (वैद्यकीय विद्यापीठे जास्त)
- स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठे : ४१

**जिल्ह्यानुसार स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठांची संख्या :**

| | | |
|---|---|---|
| नाशिक -०१ | अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) - ०१ | धुळे-०१ |
| अमरावती-०१ | छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद)- ०१ | सोलापूर- ०१ |
| नागपूर- ०२ | कोल्हापूर- ०२ | रायगड- ०२ |
| पुणे- २२ | मुंबई- ०७ | |

मागील काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र शासनाने जगातील पाच नामवंत स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांना नवी मुंबईत त्यांचे विद्यापीठ स्थापन करण्यास तत्वतः मान्यता दिली आहे.

**मविप्र विद्यापीठाची आवश्यकता**


- **उच्च माध्यमिक विद्यार्थीसंख्या :**

दरवर्षी साधारण १५०००० (दीड लाख) विद्यार्थी हे नाशिक विभागीय मंडळातून १२ वी ची परीक्षा देतात. त्यापैकी म.वि.प्र. च्या विविध शाळा व महाविद्यालयांतून दरवर्षी २२ हजारांहून जास्त (सन २०२४-२५ विद्यार्थी : २२९४७ ) विद्यार्थी १२ वी ची परीक्षा देतात.

- **मविप्र संस्थेच्या विविध वरिष्ठ आणि व्यावसायिक महाविद्यालयांतील प्रवेश :**

पुणे विद्यापीठाशी संलग्न मविप्रची वरिष्ठ महाविद्यालये तसेच विविध व्यावसायिक महाविद्यालये यातील मर्यादित प्रवेशक्षमतेमुळे अपरिहार्यपणे विद्यार्थी इतर महाविद्यालयांकडे किंवा इतर स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांकडे वळतात तर असंख्य विद्यार्थी विविध शहरांतील महाविद्यालयांत प्रवेश घेतात व त्याचा अतिरिक्त आर्थिक ताण त्यांच्या पालकांवर पडतो. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परगावी पाठविताना त्यांच्या सुरक्षिततेची देखील चिंता पालकांना कायम भेडसावत असते.

अशा परिस्थितीत आपल्या हजारो विद्यार्थ्यांना तसेच मविप्रमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या इतर संस्थेतील विद्यार्थ्यांना नाशिक शहरातच सर्व सुविधांनी युक्त, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या, रोजगाराभिमुख आणि कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमास मविप्र विद्यापीठात प्रवेश घेता येईल. जे अभ्यासक्रम मविप्रच्या इतर महाविद्यालयांत उपलब्ध नाहीत अशा औद्योगिक, सेवा आणि इतर क्षेत्रांतील निकड ओळखून, विविध नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांची सुरुवात मविप्र विद्यापीठाद्वारे करता येईल आणि प्रवेशासाठी इच्छूक सर्व विद्यार्थ्यांना त्यात प्रवेश देता येईल.





## एनईपी २०२० नुसार

# स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांचे महत्त्व

**नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी ) २०२० नुसार उच्च शिक्षणात मुद्दा क्रमांक ९. ३, १०. २ व १०. ४ नुसार काही बदल सुचवलेले आहेत. त्याचा सारांश खालीलप्रमाणे :**


- नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार भारतात उच्च शिक्षण अधिक सर्वसमावेशक आणि दर्जेदार बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मोठे स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठ असावे किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनी अशा प्रकारचे विद्यापीठ बनावे आणि त्यातून शिक्षण स्थानिक भाषेत दिले जावे, असे उद्दिष्ट आहे.
- महाविद्यालयांना स्वायत्तता देऊन त्यांना स्वतंत्रपणे काम करता यावे, अशी योजना आहे. काही महाविद्यालये संशोधन किंवा शिक्षणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या विद्यापीठात रुपांतरित होतील.
- जुनी पद्धत म्हणजे सार्वजनिक विद्यापीठाशी जोडलेली महाविद्यालये हळूहळू त्या विद्यापीठापासून वेगळे करून त्यांना स्वतंत्र संस्था बनवण्याचा विचार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे शिक्षण अधिक प्रभावी, सुलभ आणि रोजगारक्षम बनवण्यासाठी आहे. विद्यार्थ्यांसाठी ते अधिक उपयुक्त आहे .


# मविप्र विद्यापीठ व्हावे हे तर कर्मवीरांचे स्वप्न

उच्च शिक्षणाबाबतीत दूरदृष्टी असलेले शिक्षणतज्ज्ञ व विद्यापीठ कायद्याचे गाढे अभ्यासक कर्मवीर स्वर्गीय डॉ. वसंतराव पवार यांचे मविप्र हे विद्यापीठ व्हावे असा संकल्प होता. संस्थेच्या अमृत महोत्सवाच्या सांगता समारंभ १९९० मधील भाषणात त्यांनी जे सात संकल्प निर्धारित केले होते त्यातला ५ वा संकल्प त्यांच्याच शब्दांत पुढे देत आहोत.

## संकल्प :

*" संस्थेला अभिमत विद्यापीठ (Deemed University) म्हणून मान्यता मिळावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कारण मविप्र जे कार्य करते ते कोणत्याही शिक्षणसंस्थेला व शासनसंस्थेला भूषणावह ठरावे, आणि त्याचा अभिमान वाटावा असेच आहे. "*



यानंतर डॉ. पवार साहेबांनी २००७-२०१० या कालावधीमध्ये सुद्धा मविप्र विद्यापीठासाठी प्रयत्न केले होते, परंतु शासनस्तरावर नियमावली बनवण्याचे काम सुरू असल्याकारणाने सदर प्रस्ताव नंतर सादर करावा, असे सुचवण्यात आले होते.

# शंका आणि समाधान



## प्रश्न : ०१

### मविप्र संस्था स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठ स्थापन करू शकते का?

उत्तर : होय, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या घटनेतील कलम ०५ (शिक्षण शाखा) नुसार, संस्थेचे ध्येय व उद्देश साध्य करण्याकरिता समाज विविध संस्था काढेल. ज्यात उपकलम ०१ नुसार उच्च शिक्षण शाखा-कला, विज्ञान, वाणिज्य, शेतकी, अभियांत्रिकी, वैद्यकीय व इतर महाविद्यालये याप्रमाणेच इतर सर्व प्रकारच्या विश्वविद्यालयीन शिक्षण देणाऱ्या संस्था काढणे म्हणजेच विद्यापीठ स्थापन करणे असे नमूद केलेले आहे.

तसेच कलम १४ (कार्यकारी मंडळाची कामे व अधिकार) मधील उपकलम ०२ नुसार समाजाच्या नवीन शाखा उघडणे अथवा दुसऱ्या संस्था संलग्न करून घेणे. या नुसार गेल्या ०२ वर्षांपासून सातत्याने मविप्र कार्यकारिणीने आपल्या भविष्यातील नवीन योजनांमध्ये मविप्र स्वयं-अर्थ सहाय्यित विद्यापीठाचा समावेश केलेला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच अहवालामार्फत तो तपशील सर्व सभासदांपर्यंत पोहचवलेला आहे.

महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन ) अधिनियम २०२३ कलम ३ (१) नुसार शैक्षणिक कार्य करणाऱ्या कोणत्याही खाजगी परिसंस्था, सार्वजनिक ट्रस्ट, बहुउद्देशीय संस्था, सोसायटी यांना स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठे सुरु करता येतील.

## प्रश्न : ०२

### सदर विद्यापीठ स्थापनेसाठी संस्थेच्या मविप्र कार्यकारिणी तसेच व इतर तज्ज्ञ व्यक्तींनी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या विनाअनुदानित (स्वयं अर्थ सहाय्यित) विद्यापीठांना अभ्यास भेटी दिलेल्या आहेत का? असल्यास कोणत्या?

उत्तर : होय, मविप्र समाजाच्या विद्यमान मविप्र कार्यकारिणी मधील पदाधिकारी व बहुसंख्य संचालक तसेच तज्ञ प्राचार्य यांच्या मंडळाने एकत्रितपणे ऑगस्ट २०२५ मध्ये महाराष्ट्र विनाअनुदानित विद्यापीठ कायदा २०१३ व तदनुषंगिक कायद्यांन्वये स्थापन झालेल्या खालील विनाअनुदानित (स्वयं अर्थ सहाय्यित) विद्यापीठांना अभ्यास भेटी देऊन त्यांची रचना, कार्यपद्धती व विकास जाणून घेतला.


(पुढील पानावर)

- **डॉ. डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, आकुर्डी, पुणे,** (स्वयं अर्थ सहाय्यित).
- **सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, किवळे, पुणे,** (स्वयं अर्थ सहाय्यित).
- **एम. आय. टी. - ए. डी. टी. युनिव्हर्सिटी, लोणी-काळभोर, पुणे,** (स्वयं अर्थ सहाय्यित).
- **सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, लवळे, पुणे.** (अभिमत विद्यापीठ)
- **पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी, ताटे, पुणे,** (स्वयं अर्थ सहाय्यित).

तसेच मविप्र समाजासारख्या ज्या संस्थांची सभासद संख्या ५००० पेक्षा जास्त आहेत अशा संस्थांपैकी कोणीही विद्यापीठ स्थापन केलेले नाही. रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी सामूहिक (Cluster) विद्यापीठाची स्थापना २०२३ मध्ये केलेली आहे. परंतु त्यातील महाविद्यालये हे शासन अनुदानित असल्याकारणाने ते विद्यापीठ पारंपरिक विद्यापीठाप्रमाणेच संपूर्ण शासन नियंत्रित आहे.

## प्रश्न : ०३


## विद्यापीठाचे नाव व स्वरूप काय असेल ?




उत्तर : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था स्थापन होण्यामागे आणि नावारूपास येणे हे कर्मवीरांची प्रेरणा, समाजधुरीणांचा त्याग, आजवरच्या पदाधिकारी, संचालक, सभासद व सेवक यांच्या तपस्येचे फळ आहे. या सर्वांचे फलित म्हणून 'मविप्र' हे नाव सर्वश्रुत झालेले आहे. त्यामुळेच विद्यापीठास 'मविप्र विद्यापीठ' हे नाव साजेसे असेल. 'मविप्र विद्यापीठ' याच नावाने शासनास विद्यापीठ स्थापनेचा अर्ज पाठविला जाईल.

'मविप्र विद्यापीठ' हे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची एक ५११ वी शाखा असेल, मविप्र समाज संस्थेने स्वयं-अर्थ सहाय्यित केलेल्या या विद्यापीठात सध्या कार्यरत असलेल्या कुठल्याही महाविद्यालयाचा अथवा त्या त्या महाविद्यालयात असणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश न करता स्वतंत्र अभ्यासक्रम व कोर्सेस चालविले जातील.

मविप्र विद्यापीठात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, सायबर सेक्युरिटी, फॉरेन्सिक सायन्स, एनर्जी इंजिनियरिंग, ॲग्री बिझिनेस व्यवस्थापन इत्यादी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन (Ph.D.) तसेच औद्योगिक संस्थांच्या सहकार्याने त्यांना लागणारे पूरक अभ्यासक्रम व कौशल्याधिष्ठित कोर्सेस यासारखे नावीन्यपूर्ण व रोजगारक्षम अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत.



प्रश्न : ०४

## मविप्र विद्यापीठ हे खाजगी मालकीचे अथवा व्यक्तिगत एकाधिकारशाहीचे होईल का?

उत्तर : कधीच नाही, मविप्र समाज नाशिक ही संस्था सन १९१४ मध्ये स्थापन झालेली आहे. तद्नंतर संस्था नोंदणी कायदा १८६० या २१ व्या कायद्याप्रमाणे सन १९३२ साली आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० च्या २९ व्या कायद्याप्रमाणे सन १९५४ साली रजिस्टर झालेली संस्था (स्थापना वर्ष १९१४, पि. टी. आर. नंबर अे-४३६) असल्यामुळे सदर विद्यापीठ वरील मविप्र संस्था रजिस्टर क्रमांकाच्या अखत्यारीतच निर्माण होईल. मविप्र विद्यापीठ हे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्याच इतर शाखांप्रमाणेच एक शाखा असेल. विद्यापीठावर संपूर्ण नियंत्रण हे मविप्र कार्यकारिणीचेच असेल. तसेच मविप्र सरचिटणीस किंवा कार्यकारिणी मधील पात्रताधारक अनुभवसंपन्न पदाधिकारी हे विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती असतील व मविप्र कार्यकारिणीस कुलपती निवडण्याचे सर्व अधिकार असतील.

ज्या ज्या वेळेस मविप्र मधील कार्यकारिणी बदलेल त्या त्या वेळेस नवनिर्वाचित कार्यकारिणी हीच विद्यापीठाच्या नियामक मंडळाची निवड करेल. त्यामुळेच हे विद्यापीठ खाजगी मालकीचे अथवा व्यक्तिगत एकाधिकारशाहीचे कदापीही होणार नाही.

मविप्र विद्यापीठाचे कामकाज हे त्या विद्यापीठाच्या नियामक मंडळामार्फत चालवले जाईल. या नियामक मंडळातील सदस्य निवडीचे संपूर्ण अधिकार हे मविप्र कार्यकारिणीसच असतील. विद्यापीठाचे शैक्षणिक धोरण ठरविणे तसेच आर्थिक खर्चाबाबतच्या मंजुरीचे सर्व अधिकार हे कार्यरत असणाऱ्या मविप्र कार्यकारी मंडळासच असतील.

प्रश्न : ०५

## विद्यापीठाच्या कामकाजात कार्यकारी मंडळाची भूमिका, त्यांचे महत्त्व व अधिकार सुरक्षित राहतील का?

उत्तर : होय. मविप्र विद्यापीठ हे संस्थेच्या इतर ५१० शाखांप्रमाणेच संस्थेची ५११ वी नवीन शाखा असेल त्यामुळेच मविप्र कार्यकारिणीची भूमिका, अधिकार आणि महत्त्व हे इतर शाखांत आहे त्याप्रमाणेच अबाधित राहतील. मविप्र विद्यापीठाचे नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ यातील सदस्य संख्या व त्यांच्या अधिकारांची नियमावली मविप्र कार्यकारिणी तयार करेल. जेणेकरून संपूर्ण कार्यकारिणी ही विद्यापीठ नियामक मंडळ व व्यवस्थापन मंडळात प्रतिनिधित्व करू शकेल. तसेच विद्यापीठाच्या प्रशासकीय, शैक्षणिक व आर्थिकसह इतर सर्व कामकाजाची संपूर्ण माहिती वेळोवेळी मविप्र कार्यकारिणीस सादर करणे कायद्याने बंधनकारक राहील.



प्रश्न : ०६

## विनाअनुदानित (स्वयं अर्थ सहाय्यित) विद्यापीठ स्थापन झाल्यास त्यावर मूळ संस्थेचे नियंत्रण राहणार का?

उत्तर : होय. महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम २०२३ मधील मुद्दा क्र. २० ते २४ नुसार विद्यापीठाचे अधिकारी नेमण्याचे अधिकार हे कुलपतींना म्हणजेच मविप्र संस्था सरचिटणीस/ पदाधिकारी यांना असतील.

तसेच विद्यापीठाचे नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ यातील सदस्य संख्या व त्यांच्या अधिकारांची नियमावली मविप्र कार्यकारिणीच्या सल्ल्याने तयार केली जाईल. जेणेकरून संपूर्ण कार्यकारिणी ही विद्यापीठ नियामक मंडळ व व्यवस्थापन मंडळात सामावून घेता येईल.

सारांश, सर्व व अंतिम अधिकार हे मविप्र कार्यकारिणी मंडळासच राहणार आहेत. तसेच विद्यापीठाच्या वेगवेगळ्या समित्या व अभ्यास मंडळे यांवर शैक्षणिक पात्रता व गुणवत्तेनुसार मविप्र समाज सदस्य, सभासद व कर्मचारी यांना प्राधान्यक्रम दिला जाईल.

प्रश्न : ०७

## विद्यापीठाचे कुलपती यांची निवड किती वर्षांसाठी असते? व त्यांना पदावरून दूर करता येते का?

विद्यापीठाचे कुलपती, व्यवस्थापन मंडळ व इतर अधिकारी यांची निवड करण्याचा अधिकार मविप्र कार्यकारिणीस असेल. विद्यापीठाच्या नियामक मंडळ तसेच कुलपतींचा कालावधी हा मविप्र कार्यकारिणीच्या कालावधी इतका असेल. मविप्र कार्यकारिणीची मुदत संपल्यानंतर विद्यापीठाच्या कुलपती पदाचा व नियामक मंडळाचा देखील कालावधी आपोआप संपुष्टात येईल. नवनिर्वाचित मविप्र कार्यकारिणी तिथे पदग्रहण करेल. कुलपतीस अधिनियमातील कलम १८ मधील (क ते ड) अन्वये मुदत संपण्याआधी पदावरून दूर करण्याची देखील तरतूद केलेली आहे.

## प्रश्न : ०८

# विद्यापीठाच्या प्रवेशप्रक्रियेचे स्वरूप काय असेल?


उत्तर : विद्यापीठाची संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही गुणवत्तेनुसार, महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठ अधिनियम २०२३ मधील कलम ४१ नुसार मविप्र विद्यापीठ स्तरावर राबविली जाईल. विद्यापीठातील अभ्यासक्रमनिहाय सर्व उपलब्ध जागा भरण्याचे अधिकार हे मविप्र विद्यापीठालाच असतील. त्यात मविप्र संस्था सभासद पाल्य व मविप्र सेवक पाल्य यांना प्राधान्याने प्रवेश दिले जातील.

## प्रश्न : ०९

# विनाअनुदानित (स्वयं अर्थ सहाय्यित) विद्यापीठ स्थापन झाल्यास संस्थेवर अधिकचा आर्थिक भार वाढेल का ?

उत्तर : औद्योगिक तसेच सेवा क्षेत्राची गरज ओळखून विद्यापीठात तसे अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. जेणेकरून अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची पसंती व त्यातून त्यांना रोजगार असे दुहेरी ध्येय साधता येईल. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांची शुल्क निश्चिती ही अधिनियमाच्या कलम ४२ मधील १ ते ५ नुसार केली जाईल. तसेच या विद्यापीठासोबत मोठमोठ्या संस्थांशी सामंजस्य करार व सी. एस. आर च्या माध्यमातून उपक्रम राबविले जातील. परिपूर्ण नियोजनाद्वारे विद्यापीठाचा संस्थेवर आर्थिक भार पडू दिला जाणार नाही. किंबहुना मविप्रच्या इतर महाविद्यालयांत प्रचलित प्रवेशप्रक्रियेमुळे प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश मिळू शकेल. जास्त मागणी असलेल्या निवडक अभ्यासक्रमांचा विद्यापीठात समावेश केला जाईल. त्यामुळे अल्पावधीतच विद्यापीठ हे आर्थिकदृष्ट्या सक्षम स्थितीकडे वाटचाल करेल. या विद्यापीठाद्वारे मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नातून मविप्र विद्यापीठ व मविप्र संस्थेच्या ग्रामीण भागातील इतर आर्थिकदृष्ट्या कमकुवत शाखांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठाच्या सहयोगाने सामाजिक दायित्वाच्या भावनेतून शैक्षणिक मदत व आर्थिक हातभार लावता येईल.






**प्रश्न : १०**

## विद्यापीठाच्या स्थापनेसाठी कोणती व किती जागा निश्चित केली आहे ?

उत्तर : महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठ अधिनियम २०२३ या कायद्यातील आवश्यकतेप्रमाणे विभागीय मुख्यालय हद्दीत प्रस्तावित विद्यापीठास ०४ हेक्टर जागा उपलब्ध असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत अशी जागा फक्त उदाजी महाराज कॅम्पस, गंगापूर रोड येथे उपलब्ध आहे. तसेच आपले कृषी महाविद्यालय हे चाचडगाव येथे स्वतंत्र नव्या इमारतीत स्थलांतरित झाले असल्याने सदर जागा व इमारत उपलब्ध आहे.

**प्रश्न : ११**

## विद्यापीठाच्या स्थापनेसाठी किती गुंतवणूक प्रस्तावित आहे?

उत्तर : सद्यस्थितीत प्रस्तावित मविप्र विद्यापीठास (विभागीय मुख्यालय हद्दीत) आवश्यक असणारी जागा व इमारत बांधकाम उपलब्ध आहे. त्यामुळे तातडीची गुंतवणूक आवश्यक नाही. भविष्यात विद्यापीठाच्या विस्ताराप्रमाणे बांधकाम विकास व गुंतवणूक मविप्र संस्था कार्यकारिणीच्या मंजुरीने व मार्गदर्शनाने केली जाईल.

**प्रश्न : १२**

## विद्यापीठाचे इतर ठिकाणी परिसर बाह्य केंद्रे सुरू करणे शक्य आहे का ?

उत्तर : होय, महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३, मुद्दा क्रमांक ०७ मधील ०१ ते ०८ नुसार अशी केंद्रे सुरु व बंद करण्याची तरतूद केलेली आहे.

त्या अनुषंगाने मविप्र कार्यक्षेत्रातील निफाड, देवळा, नांदगाव, मालेगाव, सटाणा, येवला, चांदवड, कळवण, पेठ-सुरगाणा, सिन्नर, दिंडोरी, इगतपुरी, नाशिक ग्रामीण अशा प्रत्येक तालुक्यांमध्ये गरजेनुसार विद्यापीठाची उपकेंद्रे सुरु करता येतील. त्या त्या तालुक्यातील विद्यार्थ्यांकरिता त्यांच्या गावाजवळच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कौशल्यपूर्ण उच्च व तंत्र शिक्षणाची सुविधा उपलब्ध करता येऊ शकेल.




## प्रश्न : १३

## गोरगरिबांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण मिळणार का?

उत्तर : होय, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०२३ मधील कलम ४१, ४२ व ४३ च्या अन्वये प्रवेश प्रक्रिया आणि फी धोरण राबविले जाईल. तसेच या कायद्याच्या ०७ ऑगस्ट २०२४ च्या अधिनियम कलम ०५ (०२) नुसार विद्यापीठास, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील किमान १०% विद्यार्थ्यांना, त्यांची जात विचारात न घेता, शुल्कामध्ये ५०% इतकी सवलत देण्यात येईल असे हमीपत्र सादर करावे लागेल. जेणेकरून संस्थेच्या कर्मवीरांनी घालून दिलेल्या 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्यानुसार कार्य करता येईल. याशिवाय संस्थेच्यावतीने सभासद पाल्यांस प्रवेश शुल्कात सवलत दिली जाईल आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

## प्रश्न : १४

## प्रस्तावित मविप्र विद्यापीठाचा संस्थेच्या सभासद व त्यांच्या पाल्यांना फायदा काय?

उत्तर : प्रस्तावित मविप्र विद्यापीठ हे उच्च, तंत्र आणि व्यावसायिक शिक्षण, संशोधन व नवोपक्रम यांचे माहेरघर असेल. सभासद पाल्यांची दर्जेदार शिक्षणाच्या शोधातली भटकंती यामुळे थांबेल आणि स्वतःच्या जिल्ह्यातच आंतरराष्ट्रीय दर्जाचे व रोजगारक्षम उच्च शिक्षण त्यांना मिळू शकेल.

अर्हता (पात्रता) धारक व गुणवत्तापूर्ण सभासद तसेच त्यांच्या पाल्यांना या विद्यापीठात रोजगाराच्या बहुविध संधी निर्माण होतील.

सद्यस्थितीत अनेक सभासद स्वतः किंवा त्यांचे पाल्य तसेच संस्थेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे पाल्य हे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध नामांकित संस्थांमध्ये कार्यरत आहेत. त्यांची विद्यापीठाच्या विविध मंडळांवर सल्लागार म्हणून नेमणूक करून, त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्याचा व अनुभवाचा उपयोग मविप्र विद्यापीठाच्या गुणवत्ता वाढीसाठी करता येईल. तसेच **मविप्र विद्यापीठातून पदवी प्राप्त झालेल्या पदवी धारकांना हमखास नोकरीची शाश्वती असेल.**


## प्रश्न : १५

## विद्यापीठ बंद करायची वेळ पडल्यास त्याची सर्व मालमत्ता, जागा व संपत्ती शासन दरबारी जमा होईल का?

उत्तर: नाही, महाराष्ट्र स्वयं अर्थ सहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम २०२४, मुद्दा क्रमांक ५२ (मूळ संस्थेकडून विद्यापीठाचे विसर्जन) उपमुद्दा क्रमांक ०१ नुसार, मूळ संस्था अर्थातच मविप्र संस्था शासनास, विद्यापीठ कर्मचाऱ्यांस व विद्यार्थ्यांना तशा आशयाची १ वर्ष आगाऊ नोटीस देऊन विद्यापीठ विसर्जित करता येईल.

मविप्र संस्था ही शिक्षण प्रसाराचे आणि गुणवत्ता टिकवण्याचा नेहमीच कसोशीने प्रयत्न करते आणि विधायक विकासासाठी प्रयत्न करते. परंतु भविष्यात काही कारणास्तव विद्यापीठ बंद करायची स्थिती निर्माण झाल्यास, अशा परिस्थितीत वरील कायद्याच्या उपमुद्दा क्रमांक ०२ नुसार मविप्र विद्यापीठाचे सर्व अधिकार, मालमत्ता, जागा व संपत्ती हे मूळ संस्था अर्थात मविप्र संस्थेकडेच सुरक्षित राहतील.


सारांश, विद्यापीठ हे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी निरंतर सुरू राहणारच परंतु काही कारणास्तव बंद करण्याच्या स्थितीत विद्यापीठासाठी संस्थेने दिलेली सर्व मालमत्ता, जमीन, इमारती व इतर साहित्य हे संस्थेकडे पुन्हा सुपूर्द होऊन मविप्र संस्थेकडेच सुरक्षित राहणार आहे.




सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, किवळे, पुणे येथील भेटीदरम्यान
मा. प्र-कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार यांच्या समवेत मविप्र कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य.

---

एमआयटी - एडीटी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे चे कार्यकारी अध्यक्ष मा. डॉ. मंगेश कराड
यांच्या हस्ते स्वागत सत्कार स्वीकारताना मविप्र अध्यक्ष मा. डॉ. सुनील ढिकले






सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, लवळे , पुणे येथील भेटी दरम्यान विद्यापीठाच्या प्रधान संचालक डॉ. विद्या येरवडेकर यांच्या हस्ते स्वागत सत्कार स्वीकारताना मविप्र अध्यक्ष मा. डॉ. सुनील ढिकले, समवेत मा. कुलपती डॉ. शां. बा. मुजुमदार व मविप्र पदाधिकारी आदी.

डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, आकुर्डी, पुणे येथील भेटीदरम्यान विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती घेताना मविप्र अध्यक्ष मा. डॉ. सुनील ढिकले व कार्यकारिणी सदस्य.



# चला निर्णय घेऊया. . .

सन्माननीय सभासद, हितचिंतक बंधू आणि भगिनींनो,

मराठा विद्या प्रसारक समाज ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शिक्षणसंस्था म्हणून वाटचाल करीत आहे. काळाची पावले ओळखून शिक्षणात होणारे आधुनिक, व्यावसायिक आणि तंत्रज्ञानात्मक बदल स्वीकारणे हे सर्वांच्या हिताचे आहेत. नव्या शैक्षणिक धोरणातही मोठ्या संस्थांनी वा महाविद्यालयांनी स्वायत्त अथवा विद्यापीठ बनायला हवे. त्या माध्यमातून शिक्षणगंगा अधिक प्रवाही केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यात आपण उशीर होण्याआधीच मार्गक्रमण करण्यास सज्ज होत आहोत. भविष्यात विद्यापीठ स्थापनेचा निर्णय घेण्याची गरज नक्की पडेल पण तेव्हा वेळ गेलेली असेल. म्हणून आजच निर्णय घ्यायला हवा.


मविप्र विद्यापीठ निर्मितीत सध्या आहे त्या कोणत्याही महाविद्यालयास धक्का न लावता एक स्वतंत्र शाखा म्हणून उदयास येईल. स्वायत्ततेचे स्वातंत्र्य वापरून अधिक दर्जेदार, अधिक रोजगारभिमुख व सर्वसमावेशक अभ्यासक्रम निर्मिती याद्वारे करता येईल. शेवटी मविप्र विद्यापीठ हे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचाच एक अविभाज्य भाग म्हणून वाटचाल करेल. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" हे या विद्यापीठाचे कृतिशील तत्त्व असेल. आपल्या संस्थेचे नाव विश्वाच्या नकाशात कोरणारे उच्च दर्जाचे ज्ञानपीठ असेल. मविप्र एक ब्रँड असेल.

मविप्र हा शब्द पारदर्शकता, गुणवत्ता आणि शिस्त यांचा समानार्थी शब्द आहे. मविप्र विद्यापीठातही ही गुणवत्ता आणि दर्जा प्राधान्याने टिकविली जाईल. ती टिकवणे आणि वृद्धिंगत करणे ही संस्था पदाधिकारी, संचालक, सभासद, हितचिंतक यांसह सेवक, विद्यार्थी आणि पालक यांचीही नैतिक जबाबदारी असणार आहे. ती जबाबदारी आपण ध्येयवादी वृत्तीने पार पाडू या. काळाची हाक ऐकून एक पाऊल दमदारपणे पुढे टाकू या.


चला तर मग, ज्ञानाचे यशोशिखर गाठण्यासाठी आपण सर्वजण मिळून मविप्र विद्यापीठ स्थापन करू या आणि संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवू या. त्या अनुषंगाने या ज्ञानपालखीचे भोई होण्यासाठी आपण सर्वांनी या ज्ञानदिंडीत सामील व्हावे अशी आम्ही आपणांस नम्र विनंती करतो. धन्यवाद .

**ज्ञानासाठी शिक्षण, शिक्षणासाठी कृती !**
**संस्था उत्कर्षासाठी देऊ, विद्यापीठाला गती !!**

कारण कौशल्य, नवोपक्रम आणि समाजहिताचा संगम म्हणजेच **'मविप्र विद्यापीठ !'**



# कारभार आपल्याला करायचा
# की पाहुणा डोक्यावर बसवायचा ?



विरोधक सुचवीत असलेले

**क्लस्टर विद्यापीठ**

सर्व अधिकार व नियंत्रण राज्य सरकारचे राहतील. बाहेरचे पाहुणे कुलपती असतील.

कार्यकारिणीने सुचवलेले

**स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ**

पूर्णतः संस्थेच्या मालकीचे व संस्थेच्या नियंत्रणात राहील. मविप्र पदाधिकारी कुलपती असतील.

## समाज बांधवांनो, आता आपणच सांगा आपल्याला कुठले विद्यापीठ हवे ?